नियमीत फौजदारी खटला क्र. **७९/२०२३**
निशाणी क्र. **२२/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **दिपेश दत्तात्रेय पाटील** |
| वय सुमारे | : | ३४ वर्षे, व्यवसाय : एम्.आर. |
| निवासस्थान | : | मु. रेवदंडा, सुतार आळी, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>** :

माझी रेवदंडा सुतार आळी येथे सर्व्हे क्र. ५९अ घरासह १२ गुंठे जागा आहे. आमच्या घरात मी, माझी आई व मुलगा असे राहतो. माझ्या घराच्या बाजूला विष्णू विठोबा मुकादम याची जागा आहे. दि. १३/०३/२०२३ रोजी मी घरी होतो. माझे डोळ्याचे ऑपरेशन झालेले होते. त्या दिवशी दुपारी २.३० वाजताच्या सुमारास माझ्या जागेवर ग्रामपंचायत सदस्य संतोष मोरे, संदीप खोत, आरोपी क्र. १ व २ व त्यांची आई मंदा विष्णू मुकादम, माझी आई दर्शना दत्तात्रेय पाटील व मी उपस्थित होतो. आरोपी क्र. १ व २ हे त्यांच्या जागेत बांधकाम करत होते व ते बांधकाम थांबविण्यासाठी माझ्या वडीलांनी ग्रामपंचायतीमध्ये दि. २०/०२/२०२३ रोजी अर्ज दिला होता. ते बांधकाम आमच्या जागेत होत आहे असे आढळून आले होते म्हणून ते बांधकाम थांबविण्याबाबत माझ्या वडीलांनी अर्ज दिला होता.

०२. त्या अर्जाच्या अनुषंगाने ग्रामपंचायत सदस्य संतोष मोरे व संदीप खोत आलेले होते. त्यानंतर आमच्यात चर्चा झाली. त्यावेळेला चर्चेमध्ये मी जागेची

मोजणी करुन घ्यावी व मोजणीसाठी लागणारा खर्च मी देण्यास तयार आहे असे सांगितले. त्यावर आरोपी क्र. १ व २ यांनी माझ्या आईला शिवीगाळ केली. ते दोघे माझ्या आईला, 'तू मोठी शहाणी आहेस, आम्हाला आमच्या जागेत बांधकाम करु देत नाहीस, तुला आम्ही बघून घेतो' असे म्हणाले. त्यानंतर माझ्या आईला घेवून मी आमच्या अंगणात गेलो. त्यावेळी आरोपी क्र. १ व २ हे पाठीमागून धावून आले व माझ्या आईला खाली पाडले व तिला हाताबुक्यांनी मारहाण केली. त्यामुळे माझ्या आईच्या गळ्यातील माळ आणि मंगळसूत्र तुटून नुकसान झाले. त्यानंतर मी माझ्या आईला उचलण्यासाठी गेलो असता आरोपी क्र. १ जयेश मुकादम याने कम्पाउंडची काठी काढली आणि आरोपी क्र. २ माझ्या अंगावर धावून आला. आरोपी क्र. १ जयेश याने धावत येवून माझ्या ऑपरेशन झालेल्या डाव्या डोळ्यावर फटका मारला आणि दुसऱ्या हाताने पायावर काठीने मारले. त्यावेळी आरोपी क्र. २ ने पाय धरुन मला खाली पाडले व माझ्या उजव्या पायावर चावा घेतला. मी आरडाओरड केल्याने ग्रामपंचायत सदस्य व माझ्या आईने सोडवासोडव केली. त्यानंतर आरोपी क्र. १ व २ तेथून निघून गेले. माझ्या उजव्या पायातून रक्त येत होते. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेलो होतो. पोलीसांनी मला प्राथमिक उपचारासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले. त्यानंतर मी रेवदंडा पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दिली. मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. फिर्याद **निशाणी क्र. २३** वर आहे. मला दाखवण्यात आलेली छापील फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदर छापील फिर्याद **निशाणी क्र. २४** वर आहे. मी आरोपींना ओळखतो. ते दोघेही आज न्यायालयात हजर आहेत. मी मुद्देमाल बघितल्यास ओळखू शकतो. मला

आता दोन लाकडी फळ्या दाखवण्यात आल्या. त्या फळ्या सुपारीच्या कांब आहेत. त्यास एकत्रितरित्या **आर्टीकल 'अ'** देण्यात येत आहे.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील सौ. मानसी म्हात्रे यांचेमार्फत</u>** :

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी आणि आरोपी क्र. १ व २ जेथे राहतो तेथे आजूबाजूला नारळ व सुपारीची वाडी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या लगत वाडी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराला समोरच्या बाजूने कम्पाउंड आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचे घर व माझ्या घरामध्ये जी जागा आहे तेथे कोणतेही कम्पाउंड नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व आरोपींचे त्या हद्दीसंदर्भात पूर्वीपासून वाद सुरु आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दि. २०/०२/२०२३ रोजी आरोपींची आई वैशाली मुकादम हिने माझ्याविरुद्ध सदर जागेच्या हद्दीबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची आणि माझ्या जागेची हद्द ठरविण्यासाठी कच्च्या स्वरुपाचे लाकडी खांब लावलेले होते. हे मला माहिती नाही की, आरोपींच्या आईने दि. २०/०२/२०२३ रोजी माझ्याविरुद्ध, मी सदर लाकडी खांब उपटून नुकसान करेन, घरात येवून मारेन अशी त्यांना धमकी दिली होती. दि. २०/०२/२०२३ रोजी माझी व आरोपींची बोलाचाली झाली होती. त्या दिवशी मी स्वत: आरोपींच्या आईविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेलो नव्हतो. हे मला माहिती नाही की, आरोपींची आई वैशाली मुकादम माझ्याविरुद्ध तक्रार देण्यासाठी त्या दिवशी पोलीस ठाण्यात गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या पूर्वी माझे व आरोपींचे वाद सुरु झाले होते.

०४. हे म्हणणे खरे आहे की, दि. १३/०३/२०२३ रोजी आरोपी क्र. २ ने पोलीस ठाण्यात माझ्याविरुद्ध अदखलपात्र गुन्ह्याची तक्रार दिली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ने माझ्याविरुद्ध मी त्यांना हाताबुक्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली, ठार मारण्याची धमकी दिली, त्यांच्या आईला धक्काबुक्की करुन जमीनीवर खाली ढकलून शिवीगाळ व दमदाटी केली अशा स्वरुपाची तक्रार दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याबाबतीत घडलेली तथाकथीत घटना ही दुपारी २.३० वाजताची आहे व आरोपी क्र. २ ने दिलेल्या तक्रारीत नमूद घटना देखील २.३० वाजताची आहे. माझ्या घरापासून पोलीस ठाणे दिड ते दोन कि.मी. अंतरावर आहे. मी घटना घडल्यानंतर ३.०० वाजताच्या सुमारास पोलीस ठाण्यात पोहोचलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी फिर्याद १९.५१ वाजता दिलेली आहे. मी घटनेच्या दिवशी दुपारी ३.०० वाजल्यापासून ८.०० वाजेपर्यंत पोलीस ठाण्यात बसून होतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी फिर्याद देण्यापूर्वी माझा कोणताही तक्रारी अर्ज लिहून घेतलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी ८.०० वाजण्यापूर्वी आरोपी क्र. १ व २ माझ्याविरुद्ध तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी तक्रार देण्यापूर्वी आरोपींनी माझ्याविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली होती.

०५. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या दोघांच्या घरांच्या आजूबाजूला अनेक घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची आणि माझी हद्दीच्या बाबतीत बाचाबाची सुरु होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या बाचाबाचीत शेजारीपाजारी कोणीही आले नाहीत. त्या दिवशी आमच्यातील वादविवाद सुमारे १० ते १५ मिनिटे सुरु होता. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई व आरोपींची आई यांच्यामध्ये शाब्दीक बोलाचाली चालू होती. हे म्हणणे खरे आहे की,

ग्रामपंचायत सदस्य यांनी आमच्यात जी शाब्दीक बोलाचाली चालू होती ती सोडवण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या वडीलांनी त्यांच्या घराच्या जागेला कम्पाउंड करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे रितसर अर्ज दिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या अर्जाला मी हरकत घेतलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, रमाकांत वसईकर यांनी माझ्यासमक्ष आरोपींच्या कम्पाउंड वॉलच्या बांधकामासाठी हरकत घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी आमच्या घराची जागा आणि हद्द किती आहे हे दर्शविणारा अर्ज ग्रामपंचायतीकडे दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायतीच्या सदस्यांच्या निर्णयाला आरोपींची हरकत नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत सदस्य जागेवर आले तेव्हा मी माझ्या हद्दीत उभा होतो व आरोपी त्यांच्या हद्दीत उभे होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी प्रत्यक्षात बांधकामास सुरुवात केली नव्हती. मी माझ्या जागेची मोजणी करुन घेतलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझी जागा कुठपर्यंत आहे याची कायदेशीररित्या निश्चिती झालेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी आजतागायत माझी जागा मोजलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी देखील आजपर्यंत त्यांच्या कम्पाउंड वॉलचे बांधकाम केलेले नाही.

०६. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी प्रत्यक्षात आरोपींना कम्पाउंड वॉल करण्यासाठी मार्कींग करुन दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जागेत आणि आरोपींच्या जागेत वर्षानुवर्षे पूर्वीपासून जागेची हद्द आम्ही ठरवून घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याच हद्दीरेषेवरुन आरोपींनी बांधकाम करण्याचे प्रयत्न केले होते. मी घटनास्थळ पंचनामा करताना पोलीसांना वाढीव बांधकाम कुठून करत होते याबाबत माहिती दिली. माझ्या माहितीनुसार

पोलीसांनी वाढीव बांधकामाचे फोटो काढले. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी जे काही जप्त केले ते माझ्या जागेतून जप्त केले. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस आरोपींच्या हद्दीत त्या दिवशी गेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी दुपारी २.३० वाजता ग्रामपंचायत सदस्यांनी दिलेला निर्णय मला मान्य नसल्याने मी आरोपींना शिवीगाळ केली, त्यांच्या आईला ढकलून दिले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ने माझ्याविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली होती म्हणून मी त्याच्याविरुद्ध त्या दिवशी उशीरा पोलीस ठाण्यात जावून खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, गुन्ह्याला गांभीर्य प्राप्त व्हावे म्हणून मी माझ्या आईच्या गळ्यातील मंगळसूत्र व माळ तुटल्याचे सांगितले आहे. माझ्या आईची तुटलेली माळ व मंगळसूत्र मी पोलीस ठाण्यात जमा केलेले नाही. माझ्या आईच्या तुटलेल्या माळेचे फोटो पोलीसांनी काढले नाहीत. माझ्या पायावर काठीने झालेली मारहाण मी डॉक्टरांना दाखवली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पायाला डॉक्टरांनी जेथे मलमपट्टी केली ती जखम मला काठीने झालेली नव्हती. मी पुन्हा सांगतो की, मला काठीने जखमा झालेल्या नव्हत्या. मी पाठीवर काठीने झालेल्या जखमा डॉक्टरांना दाखवल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, डॉक्टरांनी माझ्या पाठीवर कुठलेही उपचार केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या डोळ्याजवळ काठीने मारहाण झाली नाही. मी डॉक्टरांना जखमांबाबत जसे सांगितले तसे त्यांनी लिहून घेतले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईला दवाखान्यात नेले नव्हते कारण तिला काहीही झालेले नव्हते.

०७. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींच्या अंगावर धावून गेलो आणि खाली पडलो त्यामुळे मला जखमा झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींचे कम्पाउंडचे काम होवू नये या आकसापोटी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे

नाही की, घटनेच्या दिवशी आरोपी क्र. ०१ घटनास्थळी नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ हा मानसिक रुग्ण आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी मला कोणतीही मारहाण केलेली नसताना मी खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचा गुन्ह्यात जप्त केलेल्या हत्यारांशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींची आणि माझ्या पूर्वी झालेल्या वादातून मी खोटी साक्ष दिलेली आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **श्रीमती एस्.डी. सोनी** )
दिनांक : **१८/०६/२०२४**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **७९/२०२३**
निशाणी क्र. **२७/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुहास नारायण घोणे** |
| वय सुमारे | : | ५८ वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | मु. रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत** :

दि. १४/०३/२०२३ रोजी मला रेवदंडा पोलीस ठाण्यातील गोसावी मॅडम यांनी रेवदंडा येथील नारायण आळी येथील सह्याद्री बार येथे घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्यावेळेला तेथे मी, दुसरा पंच व पोलीस हजर होते. घटनास्थळ फिर्यादीने दाखविले. फिर्यादीने त्याच्या घराच्या १० मीटर अंतरावर असलेले ठिकाण दाखविले ज्या ठिकाणी त्याला मारहाण झाली होती. पोलीसांनी दोन सुपारीच्या कांबी जप्त केल्या. एक कांब ११० सें.मी. लांब व १६ सें.मी. जाड होती. दुसरी कांब ७० सें.मी. लांब व १५ सें.मी. जाड होती. पोलीसांनी सदर दोन्ही कांबींना दोऱ्याने बांधल्या व सिल केल्या. पंचनामा सकाळी १०.३० वाजता सुरु होवून ११.३० वाजता संपला. आता मला दाखवण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. २८** देण्यात येते. मला कांबी दाखविल्यास मी ओळखू शकेन. मला

दाखवण्यात आलेल्या कांबी आर्टीकल ‘अ’ त्याच आहेत.

**सरतपास संपला**.

**उलटतपास आरोपींकरीता वकील श्रीमती उत्तरा मयेकर यांचेमार्फत :**

२. हे म्हणणे खरे आहे की, मला फिर्यादीच्या घराच्या हद्‌दीबाबत माहिती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा करायला गेलो तेव्हा फिर्यादी त्याच्या घराजवळ उभा होता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने घटनास्थळावरुन कांबी काढून दिल्या. पंचनाम्यात आरोपी क्र. २ चे नाव विलास विष्णू मुकादम असे नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचे ठिकाण फिर्यादीने स्वत:हून दाखवले. फिर्यादी आणि मी एकाच आळीत राहणारे आहोत. हे म्हणणे खरे नाही की, मी आज साक्ष देण्यासाठी फिर्यादीसोबत आलो. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझ्या परिचयाचा असल्याने त्याच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **श्रीमती एस्.डी. सोनी** )

दिनांक : **२३/०७/२०२४**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **७९/२०२३**
निशाणी क्र. **३५/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **संतोष सदाशिव मोरे** |
| वय सुमारे | : | ५५ वर्षे, व्यवसाय : व्यापार |
| निवासस्थान | : | मु. रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. १३/०३/२०२३ रोजी काय घडले हे मला माहीत नाही. माझ्या समक्ष काही घडलेले नाही.

**(साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)**

**<u>उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. मी ग्रुपग्रामपंचायत रेवदंडाचा सदस्य आहे. पोलीसांनी माझा जबाब घेतला नव्हता. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचून दाखवण्यात आला. सदरचा मजकूर मी पोलीसांना सांगितला नव्हता. पोलीसांनी तसे माझ्या जबाबात का लिहीले याचे कारण मी सांगू शकत नाही. आरोपी माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्यांना शिक्षा होवू नये म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्रीमती उत्तरा मयेकर यांचेमार्फत</u> :**

उलटतपास नाकारला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **११/१२/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**R.C.No. 79/2023**
Exh. **37/C**

Deposition of Witness No. **04** for the State

I do hereby on solemn affirmation state that :-

| | | |
|---|---|---|
| My Name | : | **Dr. Soniya Vijaykumar Jadhav** |
| Age about | : | 38 Years, |
| Occupation | : | Medical Officer, PHC Revdanda |
| Official address | : | Medical Officer, PHC Revdanda |

<u>**Examination-in-Chief by Special A.P.P. Smt. Naima Ghatte**</u> :

**01.** I am qualified as B.A.M.S. Since 2014, I am posted at Primary Health Center, Revdanda. On 13/03/2023, I was attached to Primary Health Center, Revdanda as a Medical Officer. On that day Dipesh D. Patil, aged about 33 years had come to the hospital at 3:15 p.m. along with his relatives.

**02.** He narrated me history of assault by relatives. On that day I examined him and found following injuries :

1. Abrasion over right knee size 3x4 cm. It was oval in shape and was caused by teeth
2. Abrasion over left eye size 2x3 cm. It was oblique in shape and was caused by hand.

**03.** Both the injuries were simple in nature and caused within 24 hours. Today I have brought MLC register along with me. The contents of injury certificate are true as per MLC register. Accordingly, I issued injury certificate. The injury certificate now showed to me is the same. Its contents are true and correct and it

bears my signature. It is marked as **Exh. 38.** Injury No. 2 is possible if the person is assaulted with hand. Witness says it is also possible if somebody falls down.

**Examination-in-Chief completed**.

**Cross-Examination for accused by Adv. Shri. Santosh Mhatre** :

**04.** The patient was brought by his relatives. I had received a yadi from the police station. The injured himself had brought the yadi. It is true to say that the history was narrated to me by the relatives. It is true to say that the first injury was caused to the knee of the right leg. It is true to say that there was no other injury on the leg except the knee injury. It is true to say that if a person falls on a rough surface, the injury mentioned in the certificate is possible.

**05.** It is true to say that the patient had already undergone surgery for his left eye. It is true to say that I did not refer the patient for further examination. It is true to say that I did not take the thumb impression on the injury certificate. The witness volunteers that the thumb impression was taken in the MLC register. It is true to say that below the thumb impression, the name was not mentioned.

Cross-examination complete.

No Re-examination

R. O. & A. C.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **22/01/2026.**

## :: CERTIFICATE ::

Taken before me and signed by me in the presence of accused to whom the deposition is explained in vernacular and full opportunity to cross-examine the witness, is given.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **22/01/2026.**